दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे संपादक बडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ गुरुवार दि. 09 ऑक्टोबर 2025 ■ वर्ष : 2 रे ■ अंक : 155 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL039353

## महाविद्यालयाने आपल्याला दिलेल्या ज्ञानाला विसरु नका -प्रा.विजय शेलार

महाराष्ट्र जीत

**अजनुज / प्रतिनिधी**

---------

आपल्याला जीवनात महाविद्यालयाने जे काही ज्ञान दिले त्या महाविद्यालयाला कधीच अंतर देवू नका असे श्रीगोंदा येथील जय हिंदचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय शेलार यांनी केले आहे.

श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आयोजित केलेल्या सन १९८२ ते २०२५ माजी शिक्षक विद्यार्थी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी माजी विद्यार्थी प्रा.विजय शेलार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बोलत होते.

प्रा.शेलार यांनी पुढे सांगितले की महाविद्यालयाने जे ज्ञान दिले तेच ज्ञान आम्ही पुढे चालवत आहोत आज शिवराज सुपेकर, मनोज कोथिंबीरे , ओंकार कोकणे,शाहू शिंदे सारखे उत्कृष्ट खेळाडू आम्ही घडवू शकलो याचा आजही अभिमान वाटतो. कॉलेजने अतिशय चांगल्या प्रकारे नियोजन करून माजी विद्यार्थ्यांना, माजी शिक्षकांना आमंत्रित केले या अतिशय सुंदर नियोजनाने आम्ही भारावून गेलो माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी अतिशय खडतर परिस्थितीतून हे महाविद्यालय श्रीगोंदा या ठिकाणी उभा करुन सर्व सामान्य कुटुंबातील मुला मुलींना शिक्षण घेता आले सर्व प्रथम महाविद्यालयात पहिले पाऊल टाकले त्यावेळी भव्य इमारत,मैदान पाहून भारावून गेल्याचे प्रा.शेलार यांनी सांगितले.

# वाहनचालकांनो सावधान!

## विना हेल्मेट, रॉंग साइड, प्रखर दिव्यांविरुद्ध कठोर कारवाई करा : सुप्रीम कोर्ट

महाराष्ट्र जीत

नवी दिल्ली : देशभरात रस्ते अपघातांची भीषण वाढ पाहता वाहतूक कायद्यांची कठोर अंमलबजावणी आवश्यक ठरते. फक्त कायदे बनवून उपयोग नाही, त्यांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास सार्वजनिक हिताचे उद्दिष्ट अपूर्ण राहते, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे.

२०१२ मधील जनहित याचिकेची सुनावणी न्या. जे. बी. पारदीवाला आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या समोर झाली. एका अहवालातील आकडेवारीचा उल्लेख करत खंडपीठाने सांगितले की, देशात अजूनही मूलभूत सुरक्षा नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर होत आहे.

दुचाकीस्वार आणि मागे बसणाऱ्यांना



सक्तीच्या हेल्मेटची अंमलबजावणी करावी.

रॉंग साइड वाहन चालविणे व लेन शिस्तभंगावर कारवाई करावी.

वाहनावरील एलईडी हेडलाइट्स, लाल-निळे फ्लॅश लाइट्स आणि बेकायदेशीर सायरनविरुद्ध वाहनजप्ती करून दंडात्मक मोहीम राबवावी.

स्वयंचलित कॅमेरे, लेन मार्किंग, डायनॅमिक लायटिंग, रंबल स्ट्रिप्स आणि टायर किलर्स यांसारख्या तांत्रिक उपाययोजना राबवाव्यात.

रिअल-टाइम डॅशबोर्ड तयार करून लेन उल्लंघनाची माहिती जनतेसमोर आणावी. यामुळे जनजागृती वाढेल.

पादचाऱ्यांसाठी सुविधा उभारण्याचे निर्देश

सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले की पुढील एका वर्षात, ५० प्रमुख शहरांतील अपघातप्रवण व जास्त रहदारीच्या किमान २०% रस्त्यांवर पादचारी सुविधा निर्माण करण्यात याव्यात.

पादचाऱ्यांना सुरक्षित रस्ता देणे सरकारे आणि महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

रस्त्यांसाठी मानकांचे डिझाइन, बांधकाम आणि देखभाल यासाठी नियम बनवण्याचे निर्देही न्यायालयाने यावेळी दिले आहेत.

२०२३ मध्ये नैसर्गिक आपत्ती किंवा हवामानाशी संबंधित घटनांमुळे ६,४४४ मृत्यू झाले, तर इतर मानवनिर्मित कारणांमुळे ४,३७,६६० मृत्यू झाल्याची नोंद आहे.

५० प्रमुख शहरांमध्ये देशातील १६.६% अपघात आणि १०.१% मृत्यू. २०१३ ते २०२३ या दशकात 'निसर्गाच्या कारणांमुळे' होणारे मृत्यू ७१.७% घटले.

# शिवसेना (उबाठा)पक्षाच्या वतीने वाशिम येथे विविध मागण्यासाठी रास्ता रोको आंदोलन.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत द्या

## जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना निवेदन

महाराष्ट्र जीत

वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) महायुती सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सरकारने जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा,शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ करा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना 50000 रुपये मदत द्या.या प्रमुख मागण्यासाठी खासदार संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दिनांक 8 ऑक्टोंबर रोजी स्थानिक पुसद नाका येथे शिवसेना जिल्हाप्रमुख



सुरेश मापारी यांच्या नेतृत्वात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाच्या माध्यमातून तहसीलदार वाशिम यांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की,विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी विद्यमान व पूर्वीच्या सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्तीची आश्वासन दिली होते.पण जवळपास एक वर्ष होवूनही या विषयावर कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी सततच्या नैसर्गिक आपत्ती दुष्काळी अवकाळी पाऊस गारपीट उत्पादन खर्चातील वाढ महागडी खते औषधे यामुळे आर्थिक संकटात सापडलेले आहे पिकांचे भाव हमीभावापेक्षा कमी मिळत असून उत्पादन खर्च वसूल करणे देखील कठीण झाली आहे. शेतकरी व ग्रामीण भागाचे उपजीविकेचे प्रमुख साधन असलेल्या शेतीतील उत्पन्नाला हमीभाव योग्य बाजार भाव नसल्याने बहुतांशी शेतकरी बँक व सावकाराकडील कर्जाच्या ओजाखाली दबले गेले आहेत. अनेकांना थकबाकीमुळे नोटीसा जप्ती कारवाई काही कडून तर आत्महत्येचे टोकाचे निर्णय घेतले जात आहे. दिवसेंदिवस त्याची आकडे वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी सरसकट कर्जमुक्ती हीच तातडीची व परिणामकारक उपाय योजना आहे.ही कर्जमुक्ती सर्व प्रकारच्या कर्जावर यामध्ये थकबाकीदार चालू बाकीदार यांच्यासह अल्प व मुदतीचे पीक कर्ज मध्यम मुदतीचे, सिंचन व उपकरण कर्ज शेडनेट पॉलिहाऊस,दूध उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेली तसेच सावकारी कर्ज यात समाविष्ट करण्यात यावे. यासह आदी मागण्यासाठी शिवसेना पदाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर या रास्ता रोको आंदोलनात सहभागी होऊन आंदोलन केले.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश मापारी डॉ.सुधीर कव्हर कॅप्टन प्रशांत सुर्वे,माणिकराव देशमुख, रामदास मते पाटील,गजानन जयताडे पाटील,राजू रंगबाळ,गजानन भांदुर्गे, पांडुरंग पांढरे,नंदू भोयर, देवानंद गुट्टे,विनोद पट्टेबहादूर,नामदेवराव हजारे, बालाजी वानखेडे, गजानन जैताडे,विठ्ठल चौधरी,किशोर थोरात,संतोष भोयर,सुभाष राठोड, गजानन इंगोले,बंडू शिंदे, अशोक शिराळ,केशव दुबे,संजय खुळे,गजानन श्रीराम जैताडे,आबाराव अंभोरे,किशोर वायचाळ,शालीकराम मोरे, नितीन जैताडे,बबन ठाकरे, नारायण महाले,डिगांबर बर्वे, यांच्यासह असंख्य शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करून कर्जमुक्त करा शिवसेना उबाठाची मागणी

महाराष्ट्र जीत

**सिंदखेड राजाः उमेश एखंडे**

दिनांक 8/10/2025 रोजी सिंदखेड राजा येथे तहसील कार्यालया समोर 8शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जोरदार घोषणाबाजी करत शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करून शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती करावी अशी मागणी करण्यात आली.



यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले पीक मातीमोल झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे स्प्रिंकलर व शेती उपयोगी साहित्य हे सुद्धा पाण्यामध्ये वाहून गेले. एवढेच नाही तर शेतकऱ्यांचे दुधाळ जनावरे बैल गाई म्हशी इत्यादीचे सुद्धा मोठ्या प्रमाणावर जीवित हानी झाली. त्यामुळे शेतकरी प्रचंड हवालदील झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना धीर देऊन त्यांना कर्जमुक्त करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी हेक्टरी 50 हजार रुपयाची मदत मिळण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शासनाने अत्यंत तुटपुंजी मदत जाहीर करून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाविरोधात प्रचंड चीड आहे. एकीकडे उद्योगपतींना करोडो रुपयांचे कर्ज शासन माफ करते, आणि जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज पूर्णपणे अतिवृष्टीमुळे कोसळलेला आहे ,अशा परिस्थितीमध्ये मात्र शेतकऱ्यांना भरीव मदतीची आणि कर्जमुक्तीची आवश्यकता आहे यासाठी शिवसेनेने आज तहसील कार्यालय सिंदखेड राजा येथे जोरदार घोषणाबाजी करत शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत व सरसकट कर्जमुक्ती यासाठी आंदोलन केले आहे, व तहसीलदार साहेब यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना कर्जमाफीची व हेक्टरी 50 हजार रुपये मदतीची मागणी सरकारकडे केली आहे.

यावेळी सिंदखेडराजा शिवसेनेचे तालुकाप्रमुख आत्माराम शेळके मसाजी वाघ युवा सेना तालुकाप्रमुख सिद्धेश्वर आंधळे नगरसेवक योगेश मस्के शहर प्रमुख उल्हास भुसारे दिलीप चौधरी अभिलाष मोगल शिवाजी देशमुख सोपान ढगे माधव मेहेत्रे विठ्ठल शेळके बबनराव शेळके Dr वसंतराव शेळके गोकुळ मेहेत्रे मगन जाधव सुनिल साबळे श्रीरम कुहिरे यासह अनेक शिवसैनिक हजर होते.

## हिंदी सिनेमा, साहित्य आणि नाटक रसास्वादन विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे**

**पाचोड (ता. पैठण)** – शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथे हिंदी विभागाच्या वतीने "हिंदी सिनेमा आणि साहित्य तसेच सिनेमा व नाटक रसास्वादन" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश हिंदी साहित्य, सिनेमा आणि रंगभूमी यांच्यातील नाते, कलात्मक अभिव्यक्ती आणि रसास्वादनाच्या प्रक्रियेचा सखोल अभ्यास करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून नामवंत प्राध्यापक प्रो. प्रमोद पाटील उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रस्ताविक डॉ. तुकाराम गावंडे यांनी केले. त्यांनी सिनेमा आणि साहित्य यांचे परस्परसंबंध स्पष्ट करताना म्हटले की, सिनेमा हा समाजाचा आरसा आहे जो साहित्याच्या माध्यमातून समाजातील



भावविश्व आणि वास्तव मांडतो.

प्रथम व द्वितीय सत्रात इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोडचे हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रमोद पाटील यांनी "हिंदी सिनेमा आणि साहित्यिक जाणिवा" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी प्रेमचंद, शरतचंद्र चट्टोपाध्याय, जय शंकर प्रसाद, महादेवी वर्मा, अमृतलाल नागर, काशिनाथ सिंह , यांच्या साहित्यावर आधारित चित्रपटांचा उल्लेख करत सिनेमा साहित्याची सजीव रूपांतर प्रक्रिया कशी घडवतो हे सविस्तर सांगितले.

तृतीय आणि चतुर्थ सत्राचे मार्गदर्शक डॉ चंद्रकांत जोगदंड आर. वाय. पी. महाविद्यालय, विहामांडवा येथील हिंदी विभागप्रमुख होते. त्यांनी "नाटक आणि रसास्वादनाची कलात्मक प्रक्रिया" या विषयावर सविस्तर विचार मांडले. त्यांनी सांगितले की, नाटक हे साहित्य आणि अभिनय या दोन्हींचे संमिश्र रूप असून सिनेमा त्याच संवेदनांना दृश्यात्मक माध्यमातून व्यक्त करतो. साहित्य सिनेमाचा आत्मा आहे तर सिनेमा हे साहित्याचे दृश्य रूप आहे. साहित्य आणि सिनेमा ही दोघे समाजाचा आरसा आहे साहित्य आणि सिनेमा हे भारतीय संस्कृती विचारधारा आणि मानवी भावनांना अभिव्यक्ती देते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्तम जाधव यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. विलास महाजन यांनी केले.

या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच स्थानिक साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम ज्ञानवर्धक आणि कलासंवेदनांनी परिपूर्ण अशा वातावरणात पार पडला.

# शेतकरी दांपत्याने अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिला मदतीचा हात .

### पत्नीचे सोन्याचे दागिने मोडून 51 हजार रुपयांचा मदत निधी केला तहसीलदाराकडे सुपुर्द.

### श्री दत्तधाम आश्रमाचे मठाधिश राष्ट्रसंत साईनाथ महाराज यांनी केला सत्कार.

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**तालुका प्रतिनिधी माहूर**

महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी नाल्यांना आलेल्या पूरामुळे शेतकऱ्यांची झालेली दुरावस्था पाहून महागाव माताळा येथील अल्पभूधारक शेतकरी ज्ञानेश्वर शिंदे यांनी पत्नीचे सोन्याचे दागिने मोडून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 51 हजार रुपयांचा मदतनीधी महागाव तहसीलदारांकडे सुपुर्द करुन समाजासमोर आदर्श निर्माण केल्याने दभप राष्ट्रसंत राज्याचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांनी त्यांचा हृदय सत्कार केला

श्री दत्तधाम आश्रमाचे मठाधिश महाराष्ट्र शासनाचे ब्रॅण्ड अंबेसेडर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे मार्गदर्शक राष्ट्रसंत द.भ.प.साईनाध महाराज यांनी आपल्या शिष्यमंडळीला संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन केले होते.त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत केवळ दिड एकर शेती असलेले त्यांचे निस्सीम शिष्य ज्ञानेश्वर शिंदे यांच्या शेतातील पिकही



अतिवृष्टीमुळे उध्वस्त झाले होते.परंतु त्याची पर्वा न करता त्यांनी स्वतःच्या उदरनिर्वाहाची चिंता न करता आपल्या पत्नीकडे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याची इच्छा व्यक्त केली.असता त्या मायमाउलीने क्षणाचाही विलंब न लावता आपले सोण्याचे दागीने काढून दिले ते मोडून आलेले 51हजार रुपये तहसिलदारा मार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा केले त्याबद्दल त्यांचे श्रीदत्त धाम आश्रमाचे मठाधिश साईनाथ महाराज यांनी दि 7ऑक्टोंबर 2025रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात हजारो भक्तांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार केला.

शिंदे दांपत्यानी परिस्थितीची पर्वा न करता संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी समर्पित भावनेने केलेली कामगिरी वाखाणन्या जोगीच असल्याचे गौरवोद्गार काढले त्यांचा आदर्श घेऊन ईतरांनी देखील मुख्यमंत्री सहाय्यता नीधीत यथाशक्ती मदत जमा करावी असे आवाहन याप्रसंगी केले. त्यांनी केलेले कार्य पाहुन उपस्थितांच्या डोळ्यात अश्रु आले होते.यावेळी महागावचे तहसीलदार म्हणाले की शिंदे दांपत्याने सामाजिक बांधिलकी जोपासत दाखविलेले औदार्य हे संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण असुन मनात संवेदनशीलता असेल तर मदतीसाठी सोन्याची नव्हे तर सोन्यासारखी मने पुरेश ठरतात अशा त्यागी दांपत्याची समाजाला गरज असल्याचे सांगून त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केलीआहे त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

या कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचलन शेषेराव पाटील यांनी केले तर आश्रमाचे प्रवक्ते भाउ पाटील हडसणीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## देगलूर येथे तहसील कार्यालयासमोर कर्ज माफी शेतकऱ्यांना 50 हेक्टरी 50 हजार अनुदान व पीक विमा मंजूरसाठी निदर्शने आंदोलन संपन्न

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

देगलूर शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री मा श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख माजी विरोधी पक्षनेते मा श्री अंबादास दानवे साहेब व नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख मा श्री बबनराव थोरात साहेब जिल्हा प्रमुख मा श्री भुजंग पाटील साहेब यांच्या सुचनेनुसार व सह संपर्क प्रमुख माश्री दयाल गिरी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ओला दुष्काळ जाहिर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, पीक कर्ज माफ करावे, पीकविमा मंजूर करावा आदी मागण्या संदर्भात आज दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी तहसीलदार भरत सुर्यवंशी साहेब यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले यावेळी ,



यावेळी तहसील कार्यालयासमोर घोषणाबाजी करीत निदर्शने करण्यात आले यावेळी उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर शिवसेना शहर प्रमुख संजय जोशी विधानसभा प्रमुख पांडुरंग पाटील जिल्हा समन्वयक नागनाथ वाडेकर,, शहर संघटक भगवान जाधव, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर,उपशहरप्रमुख बाबुराव मिनकीकर युवा शहर संघटक संतोष कांबळे, विभाग प्रमुख सुभाष खुनेवाड माळेगांवकर आदी सह शिवसेना ,युवा सेना पदाधिकारी, शेतकरी, शिवसैनिक, युवा सैनिक मोठ्या उपस्थितीत होते.

# संपादकीय

## सनातन की संविधान ?

'सनातन का अपमान, नही सहेगा हिंदुस्थान' असे ओरडत सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याचा राकेश किशोर नावाच्या वकिलाचा प्रयत्न ही मोठ्या अराजकाची नांदी आहे. किंबहुना कोट्यवधी भारतीयांच्या मनात खोलवर रुजलेला धार्मिक, जातीय विद्वेष व त्यातून दुभंगाची मानसिकता लक्षात घेता ही एका भयंकर आजाराची लक्षणे आहेत. हे कृत्य सरन्यायाधीशपदाचा, न्यायदेवतेचा, संविधानाचा घोर अपमान करणारे आहे. कारण, सर्वोच्च न्यायालय हेच भारतीय राज्यघटनेचे खऱ्या अर्थाने संरक्षक आहे आणि सरन्यायाधीशपदाचा बहुमान अनन्य आहे. म्हणूनच सर्व स्तरातील घटनाप्रेमी या कृत्याचा तीव्र निषेध करीत आहेत. घटनेनंतर न्या. गवई विचलित झाले नाहीत. कामकाज सुरु ठेवले. राकेश किशोरला त्यांनी माफ केले. सर्वोच्च न्यायालयाच्या वकील संघटनेने राकेश किशोर यांची सनद निलंबित केली. स्वत: अपप्रचाराला बळी पडलेले हे वकील आता ज्या पद्धतीने त्यांच्या कृत्याचे समर्थन करीत आहेत ते अधिक भयंकर आहे.

मुळात सरन्यायाधीशांनी सनातनी श्रद्धेचा अपमान केला हा आरोपच धादांत खोटा आहे. मध्य प्रदेशातील जगप्रसिद्ध खजुराहो मंदिर समूहात श्री विष्णूच्या एका भग्नावस्थेतील मूर्तीच्या जिर्णोद्धारासाठी राकेश दलाल या श्रद्धाळूने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. न्या. गवई व न्या. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने ही 'पब्लिक इंटरेस्ट' नव्हे तर 'पब्लिसिटी इंटरेस्ट लिटिगेशन' असल्याचे सांगून ती फेटाळली. खंडपीठाने स्पष्ट केले की, 'खजुराहो मंदिरे भारतीय पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत आहेत. जिर्णोद्धार हा त्यांचा विषय आहे. पुरातत्वीय कारभारात न्यायालय हस्तक्षेप करणार नाही.' सुनावणीवेळी सहजपणे न्या. गवई यांनी, याचिकाकर्ते खूपच श्रद्धाळू असतील तर त्यांनी देवालाच साकडे घालावे, देव त्यांची प्रार्थना ऐकेल, असे सांगितले. एवढ्याशा गोष्टीवरून पराचा कावळा करण्यात आला. सोशल मीडियावरील ट्रोल तसेच काही बुवाबाबांनी सरन्यायाधीशांच्या बदनामीची मोहीम उघडली. त्यावर आपल्यासाठी सर्व धर्म समान आहेत, असे न्या. गवई यांनी स्पष्ट केले. तरीही मोहीम थांबली नाही. कारण तिच्या मुळाशी धार्मिक, जातीय द्वेषाचा विखार आहे. न्या. भूषण गवई हे पहिले बौद्ध सरन्यायाधीश आहेत, हिंदू नाहीत, असा सुनियोजित प्रचार केला गेला. जातभावना चेतविण्यात आली. सरन्यायाधीश बनल्यापासून न्या. गवई यांनी सतत भारतीय राज्यघटनेचा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा, घटनात्मक मूल्यांचा, धर्मनिरपेक्षतेचा, मानवतेचा पुरस्कार केला आहे. त्यातूनच त्यांनी राकेश किशोरवर फौजदारी कारवाई टाळली. परंतु, धार्मिक, सांस्कृतिक ऐक्याचा विचार करता देशाने ही घटना किरकोळ ठरवून चालणार नाही.

महात्मा गांधींपासून दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, लंकेश अशी मोठी माणसे या अतिरेकातून आपण गमावली आहेत. अशा प्रवृत्तींना माथेफिरू म्हणून सोडून देणेही योग्य नाही. कारण, विद्वेषाच्या आजाराचे लक्षण असलेले लोक माथेफिरू किंवा इंग्रजीत ज्यांना 'फ्रिंज इलेमेंट' म्हणतात तसे वाट चुकलेलेही नसतात. बऱ्याचदा खडा टाकून अंदाज घेण्याचा प्रकार असतो. काय प्रतिक्रिया उमटतात हे चाचपून पाहिले जाते. म्हणून अशा हल्ल्याच्या विरोधात तीव्रतेने व्यक्त होणे, निषेध करणे ही तातडीची गरज असते. महत्त्वाचे म्हणजे अशी घटना व्यक्तीचे कृत्य म्हणून सोडून द्यायची नसते. धर्म, जात, वंश, भाषा, प्रांत, लिंग आदींबाबत समाज जे अभिनिवेश, अहंकार, अतिरेक पेरतो त्या विषवल्लीला आलेली ही फळे असतात. अशा कृत्यांची जबाबदारी, अपश्रेय सामूहिक व संपूर्ण समाजाचे असते. बूटफेकीची घटना घडल्यानंतर काही तासांनी का होईना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्या. गवई यांच्याशी संवाद साधला. या घटनेने प्रत्येक भारतीयाला वेदना झाल्याचे म्हटले. हे चांगलेच झाले. परंतु, एवढ्याने भागणार नाही.

राकेश किशोरने सनातनी श्रद्धेचा उल्लेख केला असल्याने सनातन धर्माचा व्यवहार पाहणाऱ्या मंडळींनी भूमिका स्पष्ट करायला हवी. हा देश सनातन परंपरेने चालणार आहे की संविधानानुसार, हेदेखील जाहीरपणे सांगायला हवे. सहा दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी सोहळ्यात सर्वधर्मसमभावाची, धार्मिक सहजीवनाची, राज्यघटनेला सन्मानाची आणि महत्त्वाचे म्हणजे हिंसाचारातून प्रश्न सुटत नसल्याची ग्वाही देण्यात आली आहेच. तेव्हा सनातन धर्माच्या अतिरेकी आग्रहातून थेट सरन्यायाधीशांवर हल्ला, राज्यघटनेला आव्हान देणारे अराजक सर्वांनी मिळून रोखायला हवे.

# अखेर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन आज पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले.

## - पंतप्रधानांनी दि.बा. पाटील यांचे नाव घेऊन त्यांच्या सन्मान केला







**अविनाश जाधव वार्ताहर**

महाराष्ट्र जीत

**कळंबोली पनवेल वार्ताहर:-** सिडको ने बांधलेल्या नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या भव्य नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दि. ८.१०.२०२५रोजी पार पडलं. PM Narendra Modi यांनी यावेळी आपल्या भाषणात लोकनेते दि.बा. पाटील यांचं नाव घेतलं. अतिशय भव्यदिव्य असा आजचा विमानतळ उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. पण सकाळपासून लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव घेण्यात आलेलं बघायला मिळालं नव्हतं. उद्घाटनाच्या कार्यक्रमावेळी भाषण करताना सुरुवातीला सीएम देवेंद्र फडणवीस यांनी दि. बा. पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील दि. बा. पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला. नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट ला लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव दिलं जावं, अशी इथल्या स्थानिक भूमिपुत्रांची मागणी आहे. त्यांच्या या मागणीनुसार अनेक घडामोडी घडल्या आहेत. स्थानिकांनी यासाठी आंदोलन देखील केलं होतं. या सर्व घडामोडीनंतर दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव केंद्रात पाठवण्यात आला आहे. तिथे प्रस्ताव मान्य झाल्यानंतर विमानतळाला नाव देण्यात येणार आहे. या सगळ्या घडामोडींदरम्यान आज विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पार पडलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठोपाठ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील आपल्या भाषणात दि. बा. पाटील यांचा उल्लेख केला.

आज मुंबईची मोठी प्रतिक्षा संपली आहे. मुंबईला आपला दुसरा आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळाला आहे. हे विमानतळ या क्षेत्राला आशियाच्या सर्वात मोठ्या कनेक्टिविटी हबच्या रुपाने स्थापन करण्यासाठी खूप मोठी भूमिका निभावणार आहे", असा दावा नरेंद्र मोदी यांनी केला.

आज मुंबईला पूर्णपणे अंडरग्राउंड मेट्रो मिळाली आहे. यामुळे मुंबईत प्रवास करणं आणकी सोपं होईल. लोकांचा वेळ वाचेल. ही अंडग्राऊंड मेट्रो विकसित भारताचं जिवंत प्रतिक आहे. मुंबई सारख्या व्यस्त शहरात जमिनीच्या खाली ही शानदार मेट्रो बनवण्यात आली आहे. मी या प्रकल्पाशी जोडले गेलेल्या प्रत्येकांचं अभिनंदन करतो", असं मोदी म्हणाले.

"या विमानतळाची संकल्पना नव्वदीच्या दशकातली होती. आम्ही जेव्हा मुंबईहून पुण्याला जायचो तेव्हा या ठिकाणी बोर्ड लावलेलं असायचं की या ठिकाणी नवी मुंबईचं आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार. पण काहीच पुढे जायचं नाही. ज्यावेळी मोदींच्या नेतृत्वात देशात आणि महाराष्ट्रात सरकारल आलं तेव्हा आम्ही मोदींना विनंती केली की, आपल्या प्रगतीच्या आराखड्यात नवी मुंबई विमानतळ घ्यावं. मोदींनी प्रगतीच्या अंतर्गत हे विमानतळ घेतल्यानंतर मागील 10 वर्षांमध्ये 8 अशा एनओसी अशा होत्या त्या मिळत नव्हत्या. मोदींनी प्रगतीची पहिली बैठक घेतली त्या दिवळी सकाळी मुख्य सचिवांनी सांगितलं की, सात नोटीस आहेत. मोदींनी विचारलं की आठवी नोटीस कुठे आहे? ती 15 दिवसांनी आली आणि मोदींच्या एका बैठकीने विमानतळाच्या कामाला सुरुवात झाली", अशी आठवण देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली.

# संविधान बचाव संघर्ष समितीची मागणी: सरन्यायाधीशांवर बूट फेकणाऱ्या राकेश तिवारींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा; सोनम वांगचुक यांची तात्काळ सुटका करा.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा,** : संविधान बचाव संघर्ष समिती, भंडारा जिल्ह्याने राष्ट्रपती आणि जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या वकील राकेश तिवारी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. तसेच, लद्दाखचे शांततावादी नेते सोनम वांगचुक यांची तात्काळ सुटका करण्याची मागणीही समितीने केली आहे. समितीने दिलेल्या निवेदनानुसार, दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयात कामकाज सुरू असताना वकील राकेश तिवारी यांनी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला आणि "सनातन धर्म का अपमान नही सहेगा हिन्दुस्थान" असे नारे दिले. या घटनेची तीव्र निंदा करत संविधान बचाव संघर्ष समितीने म्हटले आहे की, ही घटना न्यायालयासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी शरमेची बाब आहे. धर्माच्या नावावर उन्माद माजवणारे लोक भाजप आणि आर.एस.एस. च्या पाठिंब्याने मोकाट झाले आहेत, असा आरोपही समितीने केला आहे.

समितीने पुढे म्हटले आहे की, " बी. आर. गवई हे बुद्धिस्ट समाजाचे असल्याने आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदावर असल्याने मनुवाद्यांना हे सहन होत नाही. त्यामुळे जातीयतेच्या द्वेष भावनेतून हा नियोजित कट आहे." अशा शक्तींना वेळीच रोखण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

याचबरोबर, समितीने लडाखचे लोकप्रिय समाजसेवक, पर्यावरणवादी आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे वैज्ञानिक सोनम वांगचुक यांच्यावर लावण्यात आलेले देशद्रोहाचे खोटे आरोप मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करण्याची मागणी केली आहे. केंद्र सरकारने पूर्वी सन्मानित केलेल्या सोनम वांगचुक यांच्यावर कोणताही पुरावा नसताना देशद्रोहाचा गुन्हा नोंदवून तुरुंगात डांबणे म्हणजे लोकशाहीची हत्या आहे, असे समितीने म्हटले आहे.भाजपा सरकारने आपल्या निवडणूक घोषणापत्रात लडाखच्या जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची मागणी करणाऱ्या सोनम वांगचुक यांचा आवाज दाबण्यासाठी त्यांच्यावर खोटा आरोप लावून तुरुंगात टाकणे म्हणजे सरळ सरळ लोकशाही संपवून मनुवादी हुकूमशाही आणणे होय, असेही समितीने म्हटले आहे. संविधान बचाव संघर्ष समितीने राष्ट्रपतींना विनंती केली आहे की, लोकशाहीला धोक्यात आणणाऱ्या प्रवृत्तीच्या लोकांवर तात्काळ कारवाई करावी आणि सोनम वांगचुक यांच्यावरील खोटे आरोप मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करावी. तसेच, सोनम वांगचुक यांच्यावर खोटे आरोप लावणाऱ्या पोलिसांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करून त्यांना अटक करण्याची मागणीही समितीने केली आहे. निवेदन देते वेळी सदानंद ईलमे (मुख्य संयोजक), रोशन जांभुळकर (जिल्हा अध्यक्ष), चंद्रशेखर टेंभुर्णे (जिल्हा कार्यध्यक्ष), गोपाल सेलोकर (महासचिव), भैय्याजी लांबट (संयोजक), अशित बागडे (सचिव), इं. रूपचंद रामटेके (कोशाध्यक्ष), विजय भोवते (सहसचिव), प्रा. सुरेश खोब्रागडे (सहसचिव), राजेश मडामे (सहसचिव), अशोक उईके (सहसचिव), मनोहर मेश्राम (सहसचिव), डॉ. बाळकृष्ण सार्वे, अजाबराव चिचामे, कॉ. हिवराज उके, वामणराव शोधुळे, रोशन उरकुडे, राहुल डोंगरे, गोवर्धन कुभरे, प्रभाकर वैरागडे, यांसह अनेक पदाधिकारी उपस्तित होते



# वंचित बहुजन आघाडी तालुका कार्यकारणी गठित करण्याबाबत बैठकीचे आयोजन.

## तालुका अध्यक्ष दिलीप भगत यांचे बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** वाशिम येथे दि.१०/ १०/ २०२५ शुक्रवार स्थळ शासकीय विश्राम भवन वाशिम येथे वेळ दुपारी १.०० वाजता वंचित बहुजन आघाडी वाशिम तालुक्यातील सर्व आजी, माजी तालुका पदाधिकारी व हितचिंतक यांना सुचित करण्यात येते की,श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार वंचित बहुजन आघाडी वाशिम तालुका कार्यकारणी मध्ये कार्य करू इच्छित असलेल्या कार्यकर्ते यांना सुचित करण्यात येते की, वाशिम तालुका विस्तारित कार्यकारणी तयार करायची आहे. त्यासाठी वाशिम जिल्हाध्यक्ष दत्तराव गोटे,जिल्हा महासचिव,आद. प्रा रंगनाथ धांडे,महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतिताई इंगळे,

महिला आघाडी महासचिव प्रतिभाताई अंभोरे,

यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे तरी ज्यांना वाशिम तालुका कार्यकारणी मध्ये काम करण्याची इच्छा आहे. त्यांनी 'कार्यपत्र,' सह अर्ज कागदपत्रे घेऊन येणे पक्ष बळकटीकरणच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वपूर्ण आहे याची माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.व ही बैठक वेळेवर होईल याची नोंद घ्यावी.बैठकीमध्ये पक्ष प्रवेशाचा सुद्धा कार्यक्रम आयोजित केलेला आहे तरी ज्यांना पक्ष प्रवेश करायचा आहे त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन दिलीप भगत,तालुकाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी वाशिम तालुका यांनी केले आहे.

# तोंडगाव नजीक असलेल्या टोल नाक्यावर सुख सुविधा नसल्यामुळे मनसेच्या वतीने रास्ता रोको आंदोलनाची हाक.

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी)** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तोंडगाव नजीक असलेल्या टोल प्लाजावर कुठल्याही सुख सुविधा नसल्यामुळे व या ठिकाणी गेल्या तीन वर्षापासून रस्ता कामाच्या मागणीसाठी अनेक वेळा विविध स्टाईलने मनसेच्या वतीने आंदोलने देखील करण्यात आलेले आहेत मात्र तरीसुद्धा संबंधितांना याची जाग आलेली नाही म्हणून मागच्या वेळी आंदोलनादरम्यान टोलनाका फोडण्यात आला होता.त्याचबरोबर या टोल नाक्यावर कुठल्याही सुख सुविधा नसल्यामुळे प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे तसेच या ठिकाणी असलेल्या रोडचे काम सुद्धा केलेले नसल्याने विविध अपघात घडताना दिसत आहेत पर्यायी अनेक जण या ठिकाणी अपघातातून वाचले देखील आहेत मात्र पुढील अनर्थ टळावा यासाठी आता महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचा वतीने दिनांक 10/10/2025 रोजी सायखेडा रोड गेल्या तीन वर्षापासून टोल वर सुख सुविधा नसल्यामुळे रास्ता रोको आंदोलन मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या मार्गदर्शनात वाहतूक सेना जिल्हा अध्यक्ष तथा जिल्हा सचिव गजानन वरागडे यांच्या नेतृत्वात तरी सर्व मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे

# भोकर नगर परिषेदेच्या सदस्य पदाच्या सार्वत्रीक निवडणुकीसाठी सोडतीमध्ये निश्चीत झालेले आरक्षण


महाराष्ट्र जीत

**भोकर / प्रतिनिधी**

सार्वत्रीक निवडणुक २०२५ नगरपरिषदेच्या सदस्य पदाच्या निवडणुक सोडत नगरसेवक पदाचे आरक्षण दि . ८ रोज बुधवारी सकाळी १० वाजता नगरपरिषद कार्यालय येथे उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेटे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यधिकारी पवार यांच्या उपस्थितीत पार पडले . ह्या वेळी भोकर शहरातील राजकीय सामाजिक कार्यकर्ते युवापिढी महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

नगरपरिषद भोकर जि .नांदेड

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ नगरपरिषदेच्या सदस्य पदाच्या सार्वत्रीक निवडणुकीसाठी सोडतीमध्ये निश्चीत झालेले आरक्षण विवरण पुढील प्रमाणे आहे .




# श्रीसंत रोहिदास महाराज मंदिर तिर्थक्षेत्र वर्ग 'ब' च्या मान्यतेसाठी मा. आमदार हंबर्डे यांचे यशस्वी प्रयत्न.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी श्याम जगताप**

मा. खा. खतगांवकर, आ. बोंढारकर, आ. वानखेडे, मा. अध्यक्ष महाजन आदींनी केला आनंद व्यक्त नवीन नांदेड-महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम बळीरामपूर नांदेड येथे महामानव श्रीसंत रोहिदास महाराजांच्या मंदिराची इ.स. 1983 मध्ये रितसरपणे स्थापना करण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. श्री अशोकरावजी चव्हाण, व तत्कालीन पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय व खार जमीन तथा पालकमंत्री नांदेड चे रविशेठ पाटील यांचे अध्यक्षतेखाली दि. 12 ऑगस्ट 2009 रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत शासन ग्राम विकास विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मा. श्री भास्कररावदादा पाटील खतगांवकर खासदार नांदेड यांच्या केवळ पुढाकाराने श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट बळीरामपूर ता. जि. नांदेड यास तिर्थक्षेत्र 'क' चा दर्जा देण्यात आला. ज्यासाठी इ.स. 1990 पासून सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले. त्यापूर्वी दि. 3 नोव्हेंबर 2008 रोजी आदरणीय श्रीमती प्रतिभाताई पाटील मॅडम, राष्ट्रपती, भारत सरकार यांची त्यांच्या कार्यालयीन सुरक्षा पास क्रमांक 002549 अन्वये त्यांचे वामनराव विष्णुपूरीकर, संस्थापक श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट, इंद्रजित उर्फ मुन्ना पांचाळ, सरपंच व संभाजी जाधव पाटील उपसरपंच यांनी प्रत्यक्ष भेटी दरम्यान चर्चा करुन गावाच्या ट्रस्ट मंदिराच्या विकासास्तव भेट घेतली. दरम्यानच्या काळात कार्यसम्राट मा.आ.श्री मोहनअण्णा हंबर्डे यांनी सदरील तिर्थक्षेत्राच्या विकासकामी बरीचशी तरतुद उपलब्ध करुन दिली. यापुढे तिर्थक्षेत्र वर्ग 'क' चा दर्जा मिळालेल्या सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळणेस्तव इ.स. 2014 पासून शर्थीचे प्रयत्न करण्यात येत असताना मा. श्री. मोहनअण्णा हंबर्डे आमदार दक्षिण नांदेड यांनी जाणीवपूर्वक यशस्वी प्रयत्न केले व सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळवून दिला. त्यासंबंधाने शासन ग्राम विकास विभाग यांचेकडून त्यांच्या कार्यालयाचे आदेश क्रं. ई-1336250/ यो-13 दि. 29.09.2025 रोजी निर्गमीत करण्यात आलेले आहेत. सदर शुभवार्ता करताच मा. खा. श्री. भास्कररावदादा पाटील खतगांवकर, मा. आ. आनंदराव तिडके पाटील बोंढारकर, मा. आ. किशनराव वानखेडे, मा. सरदार लड्डूसिंग महाजन आदींनी आनंद व्यक्त करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत बळीरामपूर, ग्रामीण पोलिस ठाणे सिडको, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय इतवारा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम कार्यालय, जि.प. सामान्य प्रशासन विभाग कार्यालय, बळीरामपूर ग्रामस्थ, ज्ञात व अज्ञात सहकार्य मित्रमंडळी यांच्या सहकार्याबद्दल सदर तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर तथा सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, जि.प. नांदेड यांनी अंतःकरणपूर्वक आभार मानले. सदरील महत्त्वपूर्ण शासन निर्णयामुळे सदरील तिर्थक्षेत्र व बळीरामपूर गावाच्या विकासास निश्चितच चालना मिळणार असल्याचे व सदरील प्रकारचे महादलित तिर्थक्षेत्र हे सध्यातरी महाराष्ट्रातील एकमेव असल्याबाबत तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

## रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात कार्यालयीन वेळेच्या आतच शुकशुकाट.

### मनसे पदाधिकाऱ्यांनी दिली कार्यालयाला भेट कर्मचाऱ्यांची कार्यालयीन वेळ: येण्याची वेळ 9:45,तर कार्यालयातून सुट्टीची वेळ,6.15 मिनिट

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी दुपारी चार वाजून पंधरा मिनिटांनी भेट दिली असता या कार्यालयात अधिकारी व कर्मचारी कोणीही आढळून आलेली नाही.यामुळे या ठिकाणी आलेल्या रुग्णांची देखील मोठ्या प्रमाणावर पंचायत झालेली आहे.या ठिकाणी कोणी नसल्यामुळे रुग्ण आल्या पावलीच वापस वापस गेले असल्याचे देखील निदर्शनास आले आहे.मनसेचे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे मनसेचे जिल्हा सचिव तथा मनसे वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे मनसे शहर उपाध्यक्ष उमेश टोलमारे यांनी 8 ऑक्टोंबर रोजी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात चार वाजून पंधरा मिनिटांनी भेट दिली असता या कार्यालयात संबंधित अधिकारी व कर्मचारी हे कोणीही आढळून आले नसल्याने त्यांनी संताप व्यक्त केलेला आहे. शासकीय कार्यालयातील अधिकारी असो वा शिपाई सर्वांना कार्यालयात येण्याची व जाण्याची वेळ घालून दिलेली आहेत्या अनुषंगाने बहुतेक कार्यालयात बायोमेट्रिक प्रणाली द्वारे कर्मचार्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवली जाते. कार्यालयात कर्मचाऱ्यांची सकाळी येण्याची वेळ ही 9:45 ची आहे.तर कार्यालयातून सुट्टी होण्याची वेळ ही 6.15 मिनिटाची आहे.असे असले तरी या रिसोड येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात मात्र कार्यालय सुटण्याच्या काही घंटे आधीच कर्मचारी गायब झालेले आढळून आले.म्हणून या गंभीर बाबीची व वरिष्ठांनी दखल घेवून संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून त्यांचे वर कारवाई करावी अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

## शिवसेना (उ.बा.ठा) पक्षाचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर राज्यवापी आंदोलन

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**

ठाणे-मराठवाड्यातील पूरग्रस्तांना शासनाकडून भरघोस मदत मिळावी यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्रात राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. ठाण्यात जिल्हा प्रमुख केदार दिघे यांच्या उपस्थित राजन विचारे यांचे नेतृत्वतात हे आंदोलन करण्यात आले, फक्त कागदोपत्री मदत न दाखवता घोषित व प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांना केली जावी अशी मागणी ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे केली.

याप्रसंगी शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते गुरुनाथ खोत यांसह कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे,दिवा शहर प्रमुख सचिन पाटील प्रियांका सावंत, चेतन पाटील, योगेश निकम, संजय जाधव ,नितीन सावंत, संतोष कदम आदि

प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीसंत रोहिदास महाराज मंदिर तिर्थक्षेत्र वर्ग 'ब' च्या मान्यतेसाठी मा. आमदार हंबर्डे यांचे यशस्वी प्रयत्न.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी श्याम जगताप**

मा. खा. खतगांवकर, आ. बोंढारकर, आ. वानखेडे, मा. अध्यक्ष महाजन आदींनी केला आनंद व्यक्त नवीन नांदेड- महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम बळीरामपूर नांदेड येथे महामानव श्रीसंत रोहिदास महाराजांच्या मंदिराची इ.स. 1983 मध्ये रितसरपणे स्थापना करण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. श्री अशोकरावजी चव्हाण, व तत्कालीन पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय व खार जमीन तथा पालकमंत्री नांदेड चे रविशेठ पाटील यांचे अध्यक्षतेखाली दि. 12 ऑगस्ट 2009 रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत शासन ग्राम विकास विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मा. श्री भास्कररावदादा पाटील खतगांवकर खासदार नांदेड यांच्या केवळ पुढाकाराने श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट बळीरामपूर ता. जि. नांदेड यास तिर्थक्षेत्र 'क' चा दर्जा देण्यात आला. ज्यासाठी इ.स. 1990 पासून सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले. त्यापूर्वी दि. 3 नोव्हेंबर 2008 रोजी आदरणीय श्रीमती प्रतिभाताई पाटील मॅडम, राष्ट्रपती, भारत सरकार यांची त्यांच्या कार्यालयीन सुरक्षा पास क्रमांक 002549 अन्वये त्यांचे वामनराव विष्णुपूरीकर, संस्थापक श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट, इंद्रजित उर्फ मुन्ना पांचाळ, सरपंच व संभाजी जाधव पाटील उपसरपंच यांनी प्रत्यक्ष भेटी दरम्यान चर्चा करुन गावाच्या ट्रस्ट मंदिराच्या विकासास्तव भेट घेतली.

दरम्यानच्या काळात कार्यसम्राट मा.आ.श्री मोहनअण्णा हंबर्डे यांनी सदरील तिर्थक्षेत्राच्या विकासकामी बरीचशी तरतुद उपलब्ध करुन दिली. यापुढे तिर्थक्षेत्र वर्ग 'क' चा दर्जा मिळालेल्या सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळणेस्तव इ.स. 2014 पासून शर्थीचे प्रयत्न करण्यात येत असताना मा. श्री. मोहनअण्णा हंबर्डे आमदार दक्षिण नांदेड यांनी जाणीवपूर्वक यशस्वी प्रयत्न केले व सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळवून दिला. त्यासंबंधाने शासन ग्राम विकास विभाग यांचेकडून त्यांच्या कार्यालयाचे आदेश क्रं. ई-1336250/यो-13 दि. 29.09.2025 रोजी निर्गमीत करण्यात आलेले आहेत. सदर शुभवार्ता करताच मा. खा. श्री. भास्कररावदादा पाटील खतगांवकर, मा. आ. आनंदराव तिडके पाटील बोंढारकर, मा. आ. किशनराव वानखेडे, मा. सरदार लड्डूसिंग महाजन आदींनी आनंद व्यक्त करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत बळीरामपूर, ग्रामीण पोलिस ठाणे सिडको, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय इतवारा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम कार्यालय, जि.प. सामान्य प्रशासन विभाग कार्यालय, बळीरामपूर ग्रामस्थ, ज्ञात व अज्ञात सहकार्य मित्रमंडळी यांच्या सहकार्याबद्दल सदर तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर तथा सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, जि.प. नांदेड यांनी अंतःकरणपूर्वक आभार मानले. सदरील महत्त्वपूर्ण शासन निर्णयामुळे सदरील तिर्थक्षेत्र व बळीरामपूर गावाच्या विकासास निश्चितच चाचलना मिळणार असल्याचे व सदरील प्रकारचे महादलित तिर्थक्षेत्र हे सध्यातरी महाराष्ट्रातील एकमेव असल्याबाबत तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.





## मंत्री भरतशेठ गोगावले ठरले देवदूत !

### अपघातग्रस्तांना मदतीचा हात,ताफ्यातील गाडीतून स्वतः रुग्णालयात केलं दखल

महाराष्ट्र जीत

**रायगड,(केतन भोज);** राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले मुंबई वरून महाडच्या दिशेने निजामपूर मार्गे त्यांच्या निवासस्थानकडे जात असताना,रात्री १ वाजेच्या सुमारस मौजे कांदलगाव तालुका माणगाव हद्दीमध्ये मुख्यरस्त्याच्या वळणावर एका बाईकस्वाराचा बाईक वरचा ताबा सुटल्याने बाईकचा अपघात होऊन रस्त्याच्या बाजूच्या झाडांमध्ये दोन बाईकस्वार जाऊन पडले होते.यावेळी हे दुचाकीस्वार जखमी अवस्थेत रस्त्याच्याकडेला मदतीच्या प्रतिक्षेत पडून होते.त्यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांचा ताफा त्याठिकाणांहून जात असताना त्यांचे लक्ष मदतीच्या प्रतिक्षेत असणाऱ्या त्या जखमी दुचाकीस्वारांवर गेले आणि त्यांनी लगेच आपल्या गाड्यांचा ताफा थांबवत मदत मागणाऱ्या जखमी दुचाकीस्वारांच्या मदतीला धावून जात आपल्या अंगरक्षकांच्या मदतीने झाडीत पडलेल्या अपघातग्रस्त दुचाकीस्वारांना तेथून काढून आपल्या ताफ्यातील वाहनांमध्ये बसवून स्वतः त्यांच्या सोबत रुग्णालय पर्यंत जाऊन ग्रामीण रुग्णालय माणगाव येथे उपचारासाठी दाखल केले.यावेळी ही घटना कळताच तत्काळ मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या पोहचण्या अगोदरच त्याठिकाणी रुग्णालया मध्ये युवा जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी रुग्णालयातील डॉक्टर तसेच कर्मचारी यांना दुचाकीस्वारांच्या या घडलेल्या घटनेबद्दल माहिती देत तत्काळ उपचार करण्यासाठी तयार राहण्यास सांगितले.यावेळी रुग्णालयातील डॉक्टर आणि सर्व कर्मचारी यांनी देखील तत्काळ मदत करून जखमी दुचाकीस्वारांवर उपचार करण्यास त्याठिकाणी सुरुवात केली.





## भंडारा येथे १२ ऑक्टोबर रोजी एरंडेल तेली समाजाचा भव्य कोजागिरी वधू-वर परिचय मेळावा

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधि / हंसराज भंडारा.**

**भंडारा:** एरंडेल तेली समाज संताजी बहुउद्देशीय संस्था, भंडारा यांच्या वतीने येत्या १२ ऑक्टोबर २०२५ रोजी, रविवारी सकाळी १० वाजता मंगलमूर्ती सभागृह, खात रोड, भंडारा येथे भव्य कोजागिरी वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात उत्कृष्ट खेळाडू व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ देखील पार पडणार आहे.



या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उद्योगपती रामदास तरारे (बिलासपूर) असतील, तर उद्घाटन डॉक्टर देवेंद्र कैकाडे (वानाडोंगरी, नागपूर) यांच्या हस्ते होईल. माजी नगराध्यक्ष रामदास शहारे गुरुजी, प्रशांत कांबळे, आमदार नरेंद्र भोंडेकर (भंडारा), आमदार राजू कारेमोरे (तुमसर), प्रिन्सिपल डॉक्टर सोमदत्त करंजेकर (वैनगंगा अभियांत्रिक महाविद्यालय, डोंगरगाव, नागपूर), आमदार अभिजीत वंजारी आणि खासदार प्रशांत पडोळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

या कार्यक्रमासाठी चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, हिंगणघाट, भिवापूर, ब्रह्मपुरी, बिलासपूर, बालाघाट, अमरावती, सावनेर, रामटेक येथून समाजबांधव उपस्थित राहणार आहेत.

कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष बाळू नागोसे, उपाध्यक्ष महेश शहारे, सचिव रामू शहारे, कोषाध्यक्ष दामोदर तरारे, ओमराज नागोसे, निखिल भजनकर, सुदीप शहारे, विनोद नागोसे, गौरव कैकाडे, सचिन शहारे आणि समस्त मंडळ व समाजबांधवांनी एरंडेल तेली समाजातील बांधवांना या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## अवैध रेती वाहतुकीवर स्था.गु.शा. पथकाची धडक कारवाई; तब्बल १४.१२ लाखांचा मुद्देमाल जप्त

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**तुमसर :-** स्थानिक गुन्हे शाखेच्या (स्था.गु.शा.) पथकाने तुमसर पोलीस स्टेशन हद्दीत अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन ट्रॅक्टर-ट्रॉली आणि त्यातील रेतीसह एकूण १४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्था.गु.शा. भंडारा येथील पोलीस उपनिरीक्षक पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथक पोलीस स्टाफच्या मदतीने मौजा डोंगरला परिसरात पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी त्यांना अवैध रेती वाहतूक करताना दोन ट्रॅक्टर-ट्रॉली आढळून आल्या. पथकाने त्वरित कारवाई करत आरोपी रवींद्र घनशाम पटले (वय ३२, रा. डोंगरला, ता. तुमसर) आणि विजय रतनलाल पटले (वय ४५, रा. डोंगरला, ता. तुमसर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातील निळ्या-पांढऱ्या रंगाचा स्वराज ७३५ कंपनीचा ट्रॅक्टर (क्रमांक MH36 AR0389) आणि त्यावरील विना क्रमांकाची निळ्या रंगाची ट्रॉली, तसेच अंदाजे १ ब्रास रेती असा एकूण ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच, दुसऱ्या कारवाईत, निळ्या-पांढऱ्या रंगाचा स्वराज ७३५ कंपनीचा आणखी एक ट्रॅक्टर (क्रमांक MH36 AG2150) आणि त्यावरील निळ्या रंगाची ट्रॉली (क्रमांक MH36 AL8092) व अंदाजे १ ब्रास रेती असा एकूण ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही घटनांमधील मुद्देमालाची एकूण किंमत १४ लाख १२ हजार रुपये इतकी आहे.

आरोपी हे विना परवाना अवैध रेती वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून तुमसर पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक ६५९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ई), ३ (५), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८ (८) आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ७, ९ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन , अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे आणि पोलीस निरीक्षक चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. पाटील, पो. हवा. पटोले, भानारकर, पोशि ढबाले (स्था. गु.शा. भंडारा) यांनी यशस्वीपणे पार पाडली. या प्रकरणाचा पुढील तपास तुमसर पोलीस स्टेशनचे अधिकारी करत आहेत.



**जप्त केलेला मुद्देमाल:**
१. स्वराज ७३५ ट्रॅक्टर (MH36 AR0389) आणि विना क्रमांकाची ट्रॉली + १ ब्रास रेती: एकूण ७,०६,०००/- रुपये.
२. स्वराज ७३५ ट्रॅक्टर (MH36 AG2150) आणि ट्रॉली (MH36 AL8092) + १ ब्रास रेती: एकूण ७,०६,०००/- रुपये.
एकूण मुद्देमाल: १४,१२,०००/- रुपये.

## राज्य अध्यक्ष यु जी बोराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कुडे बुद्ध लेणी येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा सांगता समारंभ संपन्न

महाराष्ट्र जीत

**बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड )** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा दक्षिण विभाग पुरुष व महिला कार्यकारिणी यांच्या विद्यमाने,भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या सहकार्याने तसेच संस्कार विभाग रायगड दक्षिण यांच्या अधिपत्याखाली वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा सांगता समारंभ मंगळवार, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता कुडे बुद्ध लेणी येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु. जी. बोराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष जाधव यांनी भूषविले.

या प्रसंगी महाराष्ट्रा राज्य प्रचार व पर्यटन उपाध्यक्ष उत्तम मगरे, राज्य कार्यालयीन सचिव बापुसाहेब निकाळजे तसेच अनेक जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात खालू बाजा,लेझीमच्या ठेक्यावर व समता सैनिक दलाच्या ताफ्याने मान्यवरांची कुडे लेणी येथे भव्य मिरवणुकीने झाली.कुडे लेणी येथे समता सैनिक दलाच्या वतीने प्रमुख मान्यवरांना जनरल सलामी देण्यात आली. त्यानंतर तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्पपूजन करून सामुदायिक वंदना व सूत्रपठण घेण्यात आले. स्वागताध्यक्ष म्हणून तळा तालुका अध्यक्ष रामदास शिंदे तसेच अनंत मोरे यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



या प्रसंगी रायगड जिल्हा संस्कार उपाध्यक्ष नितीन मोरे, ॲड. बिपीन साळवी, संगीता तांबे, अनंत मोरे, रवींद्र आयनोडकर, सुनील जाधव,अनंत कासारे,प्रबुद्ध जाधव,प्रसाद चाफे, प्रतिभा शिंदे, सरिता तांबे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य संस्कार सचिव बापुसाहेब कांबळे यांनी आपल्या मनोगतात "बौद्ध धम्म केवळ सांगण्यापुरता नसून आचरणातून जोपासला गेला पाहिजे, तरच समाजाची उन्नती होईल," असे प्रतिपादन केले.राज्य कार्यालयीन सचिव बापूसाहेब निकाळजे यांनी "कुडे लेणीचा हा ऐतिहासिक वारसा जतन करून धम्म जिवंत ठेवणे ही काळाची गरज आहे," असे सांगितले. तळा तालुका अध्यक्ष रामदास शिंदे यांनी आपल्या मनोगतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दहा ध्येय-उद्दिष्टांवर भर देत, "नवीन पिढीसाठी धम्म आणि शिक्षण याकरिता लवकरच बुद्धिस्ट सेमिनरीज उभारण्यात येईल," अशी घोषणा केली.

प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु.जी.बोराडे यांनी तळा तालुका व रायगड दक्षिण विभागाने केलेल्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आभार मानले आणि "दोन्ही संस्था एकत्र राहून काम करत असल्यास आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करू शकतो," असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रायगड जिल्हा सरचिटणीस नवनीत साळवी यांनी गतिमान पद्धतीने केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तळा,माणगाव,म्हसळा,महाड,रोहा,श्रीवर्धन,पोलादपूर शाखांचे पदाधिकारी,धम्म उपासक-उपासिका तसेच रायगड जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली समता सैनिक दलाचे सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी कुडे येथील रहिवासी व तळा तालुका माजी कार्यालयीन सचिव केशव लोखंडे यांनी आलेल्या लोकांसाठी भोजनदान दिले तसेच तळा, मुंबई व माणगाव येथील दानदात्यांच्या धम्मदानातून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय मनोगत रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष जाधव यांनी व्यक्त केले, तर आभार प्रदर्शन रायगड जिल्हा महिला अध्यक्षा अस्मिता जाधव यांनी केले. सरणत्तय घेऊन वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा समारोप करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी तळा तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा व बौध्दजन पंचायत समिती या दोन्ही संस्थेच्या कार्यकर्त्यांनी अपार मेहनत घेतली.


## गुंडवळ तलावाच्या बांधावरील झाडे तोडा

### झाडे मोठी झाल्याने तलाव फुटण्याची शक्यता

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे तालुका प्रतिनिधी माहूर**

माहूर तालुक्यातील रुई-गुंडवळ येथील साठवण तलावाच्या बांधावर मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढली आहेत. तसेच त्यामुळे बांध फुटण्याच्या स्थितीत आहे. शिवाय त्या ठीकांनी वाढलेल्या झाडे झुडपा मुळे साप विंचू व इतर हिंसक वन्य प्राणी त्या ठिकाणी निवास करीत असल्याने शेतकऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांच्या जीवित्वास हानी होण्याची शक्यता आहे. तसेच बांध - फुटल्यास गुंडवळ, गाव व तांडा तसेच रुई गावाचे मोठे नुकसान होइल त्यामुळे बांधावर मोठी झालेली झाडे तात्काळ तोडावीत अशी मागणी निवेदनाद्वारे भाजपाचे अनुसूचित जाती आघाडीचे तालुका उपाध्यक्ष गजानन किसन कऱ्हाळे यांनी केली आहे



माहूर तालुक्यातील मोठ्या साठवण तलावापैकी एक असलेला मौजे गुंडवळ येथील तलाव गाळाने भरला असून थोडेसे पाणी जरी पडले तर तलाव पूर्ण भरून जातो तसेच अनेक वर्षापासून येथे वाचमन नसल्याने बांधावर मोठाली झाडे उगवली असून या झाडाच्या मुळ्यामुळे बांधावर अनेक ठिकाणी क्रॅक पडले असून तलाव फुटण्याची शक्यता निर्माण झालेली आहे लघु पाटबंधारे विभागाकडून तलावाच्या देखरेखीसाठी कुणीही नसल्याने तलावाच्या बांधावरून तयार करण्यात आलेला रस्ता अनेक ठिकाणी दुभंगला आहे

लघु पाटबंधारे विभागाने तात्काळ या बाबीची दखल घेऊन पाहणी करत झाडे तोडून पाणी व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेले कॅनल पूर्ववत सुरू करून येथे वाचण्याची नियुक्ती करावी अशी मागणी उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे गजानन कऱ्हाळे यांनी केली आहे

## अर्थशास्त्र विभागामार्फत राष्ट्रीय क्षमतावर्धन कार्यक्रमाचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे**

शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड व प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण या दोन्ही महाविद्यालयातील आयक्यूएससी, अर्थशास्त्र विभाग, पीएम उषा सहयोग यांच्या संयुक्त विद्यमानाने "अर्थशास्त्र शिक्षणाद्वारे शिक्षकांनी विद्यार्थी सक्षम बनवणे" या विषयावर आधारित एक दिवसीय राष्ट्रीय क्षमतावर्धन कार्यक्रम 10 ऑक्टोबर 2025 रोजी स्थळ शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात देशभरातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे उद्दिष्ट शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या अध्यापन, संशोधन व आर्थिक विश्लेषण क्षमतेचा विकास करून शिक्षण प्रक्रियेला अधिक प्रभावी, संशोधनाभिमुख आणि विद्यार्थी-केंद्रित बनविणे हे आहे. या कार्यक्रमात विविध सत्रांमध्ये प्रख्यात तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार असून, अर्थशास्त्र शिक्षणातील नवे प्रवाह, अध्यापन कौशल्य, डिजिटल शिक्षण पद्धती आणि संशोधनवृत्ती यांवर विशेष भर दिला जाणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटनप पाचोडचे सरपंच मा. शिवराज भुमरे यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद डॉ. विलास खंदारे, डॉ. सोनाजी पतंगे, डॉ. दिलीप अर्जुने, डॉ. मोरे व डॉ. विश्वनाथ कोक्कर उपस्थित राहणार आहेत. या

कार्यक्रमाचे आयोजक प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे, प्राचार्य शिवानंद कांबळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शिवाजी यादव, डॉ. दीपक भुसारी, डॉ. सुभाष राठोड, डॉ. चौधरी, प्रो. संदीप सातोनकर या सर्वांनी विद्यार्थी व प्राध्यापकांना सहभागी होण्याचे आव्हान केले आहे. आयोजन समितीचे सर्व सदस्य या कार्यक्रमाच्या तयारीत सक्रिय आहेत. हा कार्यक्रम शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतावर्धनासाठी एक प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## अपघात टाळण्यासाठी अमृत नगर ओएनजीसी कॉलनी ते सुजाता हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

महाराष्ट्र जीत



**घाटकोपर,(केतन भोज);**अमृत नगर ओएनजीसी कॉलनी ते सुजाता हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावर वाहनांचा वेग हा जास्त होत असल्याकारणाने याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी केली जात आहे.तसेच येथे बाजूलाच मार्केट,बँक,शाळा विद्यालये आहेत.तसेच हा प्रचंड रहदारीचा मुख्य रस्ता असल्याकारणे मुख्यतः याठिकाणी सकाळच्यावेळी स्कूल बस देखील मोठ्या प्रमाणावर येत- जात असतात.त्यामुळे शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करता भविष्यात याठिकाणी कोणताही अपघात होऊ नये यासाठी आणि याची गांभीर्यता ओळखून तातडीने मनपा एन विभागाने या रस्त्यावर गतिरोधक बसवावेत.अशी मागणी स्थानिक नागरिक तसेच स्कूल वाहन चालक करत आहेत.

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी अर्धापूर येथे भव्य रास्तारोको आंदोलन

महाराष्ट्र जीत

**अर्धापूर :- उध्दव सरोदे**

महाराष्ट्र राज्यात व विशेष करून मराठवाड्यात महाभयंकर अतिवृष्टीमुळे खरिपांच्या पिकांची खूप मोठी नासाडी झाली असून शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफी, हेक्टरी एक लाखांची मदत मदत, विम्यांची रक्कम त्वरित द्यावी यांसह विविध मागण्यांसाठी शहरातील बसवेश्वर चौकात सोमवारी (ता.सहा) रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती. शेतकऱ्यांच्या घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला होता.अर्धापूर तालुक्यात झालेल्या



सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपातील सर्व पिकें पाण्यात वाहून गेली आहेत.पिकांच्या नुकसानामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला असून नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज असून तालुक्यातील संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन करुन आपला आक्रोश व्यक्त केला. शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले असून यामध्ये पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत."हेक्टरी एक लाखांची मदत देणे,केळी व सोयाबीन पिकांचा विमा मंजूर करण्यात यावा, ज्या पशुपालकांचे जनावरे पाण्यात वाहून गेली आहेत त्यांना ७० हजारांची मदत देण्यात यावी, शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावा, पडझड झालेल्या घरांसाठी एक लाखांची मदत देण्यात यावी, शेतमालाला वाढीव हमीभाव देण्यात यावा,खरडुन गेलेल्या शेतीच्या दुरुस्तीसाठी हेक्टरी पन्नास हजार मदत देण्यात यावी यांसह इतर अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत व त्या लवकरात लवकर पूर्ण नाही केल्या तर केंद्र व राज्य सरकार विरुद्ध शेतकरी यापेक्षाही जास्त रूद्ररूप धारण करून मोर्चे,आंदोलने, जाळपोळ,आमरण उपोषण,दंगल आदि प्रकार व घटना करतील अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे**

दारवा येथे आज दुपारी एक वाजता बस स्टॅन्ड चौक येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अजय गाडगे शिवसेना उपजिल्हाप्रमुख यांच्या नेतृत्वात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे यवतमाळ जिल्हा ओला दुष्काळ घोषित झालाच पाहिजे .शेतकऱ्यांना 50 हजार रुपये अनुदान मिळाले पाहिजे, यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी सदर आंदोलन करण्यात आले.यावेळी संतोष ठाकरे,अमोल दुधे ,रामेश्वर गिरी,गोपाल भोयर,स्वप्नील मापारे,अँड भगत,वहीत खाँसाब ,निसार शेख, जयश्रीताई मिरासे, रवी तरटे विकी जामकर, किसन गायकवाड ,अजिंक्य निमकर ,मृणाली मोहोळ, रामहरी लोखंडे. सागर



दानिश शेख, चौधरी, रवी ठाकरे संतोष नारनवरे ,नीरज देशकरी, रामा लोंढे ,राजेश पवार, कैलास कटले, संतोष भोयर यासह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## रुद्र नेमाने याचे कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश!!

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे**




दि.७/१०/२०२५ मंगळवारी झालेल्या विभागीय स्तरावरील ग्रीको या कुस्ती प्रकारात जवाहर मा.व उच्च मा.विद्यालयाचा विद्यार्थी रुद्र विलास नेमाने याने प्रथम क्रमांक पटकावत पुढील महिन्यात रायगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र होण्याचा मान मिळवला त्याच्या या अभूतपूर्व यशामुळे त्याचे सर्व स्थरातून कौतुक होतं आहे याचेच औचित्य साधून रुद्र नेमाने याचा जवाहर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने प्राचार्य प्रभाकर खंबाट सर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक राजकुमार भुमरे सर यांच्या हस्ते ह्रदय सत्कार करण्यात आला व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## पुरग्रस्त महिलांना नासिक येथील स्वर्णकार महिला मंडळ सामाजिक संस्थेचा आधार...

### दिवाळीच्या तोंडावर एक हात मदतीचा उपक्रम राबवत महिलांना साड्या वाटप करत दिला आधार...

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

गेल्या महिन्यात नांदेड जिल्ह्यात मोठी अतिवृष्टी झाल्याने गोदावरी नदीला मोठा महापुर येऊन अनेकांच्या घरातील जिवनावश्यक वस्तू वाहून गेल्या तर अनेकांचे संसार उघड्यावर पडले. असून या पिडीत कुटुंबाला आधार देण्यासाठी नासिक येथील स्वर्णकार महिला मंडळ या सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्य समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेल्या श्रीमती मीनाताई सोनार, यांच्या कडून पुरग्रस्त सर्व महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

ऐन दिवाळीच्या तोंडावर अतिवृष्टी होऊन गोदावरी नदीच्या महापुरात अनेकांची घरे उद्वस्त झाली . कपड्यासह घरातील सर्वच वाहून गेले. अशा परिस्थितीत आपण बघ्याची भूमिका न घेता. आपण समाजाचे काही देणं लागतो. अशावेळी मानव धर्म पाळणार नाही तर कधी पाळणार आहोत . त्यामुळे येथील पुरग्रस्तांची आपल्याने होईल तेवढी त्यांची मदत करावी हा, उद्दात हेतू, डोळ्या समोर ठेवून महाराष्ट्र राज्याचा समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेल्या श्रीमती मीनाताई सोनार, यांनी आपल्या महिला सहकार्यांना सोबत घेऊन नांदेड येथील सर्व पिडीत पुरग्रस्त





महिलांना एक हात मदीचा उपक्रम राबवत साड्याचे वाटप करत दिवाळीची जणू भेटच देवून आपले सामाजिक कार्य केले आहे.

यावेळी ज्येष्ठ समाजसेविका गीताताई नवसे, सौ.प्रमिलाताई कैलास मैद, सौ तनुजाताई गोपाळ कुलथे ,सौ अनिताताई मंडलिक, माजी नगरसेविका सौ लंकाताई हगावणे, शुभांगी काजळे, सीमाताई माळवे, सौ पुष्पाताई कुलथे, प्रीतीताई बोबाडे, सौ मीनाक्षीताई रूपवते, श्रीमती पवळेताई, वीणाताई व सौभाग्य नगरचे गजानन लॉन्ड्री वाले अमित , शीलाताई डहाळे, मयांक डहाळे, यांच्यासह आनेकांनी मदत करून नांदेड येथील पुरग्रस्त महिलांना साड्या वाटप करून मदत केल्याने येथील पुरग्रस्त महिलांच्या चेहऱ्यावर काही प्रमाणात का होईना दुःखावर सुखाची किनार टाकली असल्याचे आनंद दिसत होते. ही, पुर परिस्थिती म्हणजे नैसर्गिक संकट आहे. अशा संकटाच्यावेळी आपण मानव धर्म पाळला पाहिजे आपल्याने जेवढी होईल तेवढी त्यांची मदत करून त्यांचे दुःख वाटून घेऊन त्यांना आधार देऊन त्यांचे मनोबल वाढून त्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी मानवता आहे. एकमेकांची मदत करत ही, मानवता प्रत्येकाने जपली पाहिजे. -- श्रीमती मीनाताई सोनार,- स्वर्णकार महिला मंडळ या सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा . नासिक

## महाविहार बावरी नगर दाभड येथे अश्विन पौर्णिमेनिमित्त पुज्य भन्तेजींची धम्मदेसना ....

महाराष्ट्र जीत

**०० चौकट ००**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी उध्दवराव सरोदे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा केला सत्कार ...**

**अर्धापूर :- उद्धव सरोदे**

अश्विन पौर्णिमा व वर्षावास अधिष्ठान समापन महाविहार बावरी नगर दाभड ता.अर्धापूर जि.नांदेड येथे दि ७ ऑक्टोबर रविवार रोजी सकाळी नऊवाजल्यापासून धम्मदेसनेला सुरुवात झाली.प्रारंभी महाकारूणीक तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुज्य भन्तेजींचा संघ व मान्यवरांच्या हस्ते पूजा करून त्रिसरण पंचशील ग्रहण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर पुज्य भन्तेजी सत्यपाल,पुज्य भन्तेजी बुद्धभूषण यांनी धम्मदेसना दिली.यावेळी महाउपासक डॉ.एस.पी गायकवाड, भंन्ते अश्वजीत,भंन्ते संघपाल,भंन्ते शिलवान,भिक्कुनी आर्याजी यांची प्रमुख उपस्थिती होती.याच कार्यक्रमात नुकतीच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती झालेले तथा भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हा संघटक उद्धवराव सरोदे



यांचा प्रा.बि.एम.वाघमारे,एस.टि.पंडीत,अशोकराव गोडबोले,गंगाधरराव सुर्यवंशी,डी.डी भालेराव,ईश्वर सावंत, सदावर्ते एस.एन.यांच्या हस्ते यथोचित अभिनंदन व सन्मान करुन सत्कार करण्यात आला. यावेळी डि.पी. गायकवाड,जनार्दन जमदाडे,भारतीय बौद्ध महासभा नांदेडचे उत्तमराव हुताडे,श्रावण मेथेकर,प्रकाश अभंगे, सुनील ढगे,साहेब लोखंडे,अमोल सरोदे यांची सुध्दा प्रमुख उपस्थिती होती.यासोबतच अमोल उद्धवराव सरोदे यांनी त्यांच्या वाढदिवस व पोर्णिमा अशा दोन्ही संगमाच्या निमित्त महाविहार बावरी नगर दाभड येथे सर्व बौद्ध उपासक उपासिका यांना केळी वाटप केली.यावेळी नागेश सरोदे,त्रिरत्न सरोदे,सचिन किर्तने, देवानंद कांबळे यांच्यासह बौद्ध उपासक उपासिका यांनी भोजनदानाचा लाभ घेतला.यावेळी बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीसंत रोहिदास महाराज मंदिर तिर्थक्षेत्र वर्ग 'ब' च्या मान्यतेसाठी मा. आमदार हंबर्डे यांचे यशस्वी प्रयत्न.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी श्याम जगताप**

मा. खा. खतगांवकर, आ. बोंढारकर, आ. वानखेडे, मा. अध्यक्ष महाजन आदींनी केला आनंद व्यक्त नवीन नांदेड- महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम बळीरामपूर नांदेड येथे महामानव श्रीसंत रोहिदास महाराजांच्या मंदिराची इ.स. 1983 मध्ये रितसरपणे स्थापना करण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. श्री अशोकरावजी चव्हाण, व तत्कालीन पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय व खार जमीन तथा पालकमंत्री नांदेड चे रविशेठ पाटील यांचे अध्यक्षतेखाली दि. 12 ऑगस्ट 2009 रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत शासन ग्राम विकास विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मा. श्री भास्कररावदादा पाटील खतगांवकर खासदार नांदेड यांच्या केवळ पुढाकाराने श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट बळीरामपूर ता. जि. नांदेड यास तिर्थक्षेत्र 'क' चा दर्जा देण्यात आला. ज्यासाठी इ.स. 1990 पासून सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले. त्यापूर्वी दि. 3 नोव्हेंबर 2008 रोजी आदरणीय श्रीमती प्रतिभाताई पाटील मॅडम, राष्ट्रपती, भारत सरकार यांची त्यांच्या कार्यालयीन सुरक्षा पास क्रमांक 002549






अन्वये त्यांचे वामनराव विष्णुपूरीकर, संस्थापक श्री संत रोहिदास महाराज मंदिर ट्रस्ट, इंद्रजित उर्फ मुन्ना पांचाळ, सरपंच व संभाजी जाधव पाटील उपसरपंच यांनी प्रत्यक्ष भेटी दरम्यान चर्चा करुन गावाच्या ट्रस्ट मंदिराच्या विकासास्तव भेट घेतली.

दरम्यानच्या काळात कार्यसम्राट मा.आ.श्री मोहनअण्णा हंबर्डे यांनी सदरील तिर्थक्षेत्राच्या विकासकामी बरीचशी तरतुद उपलब्ध करुन दिली. यापुढे तिर्थक्षेत्र वर्ग 'क' चा दर्जा मिळालेल्या सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळणेस्तव इ.स. 2014 पासून शर्थीचे प्रयत्न करण्यात येत असताना मा. श्री. मोहनअण्णा हंबर्डे आमदार दक्षिण नांदेड यांनी जाणीवपूर्वक यशस्वी प्रयत्न केले व सदरील तिर्थक्षेत्रास वर्ग 'ब' चा दर्जा मिळवून दिला. त्यासंबंधाने शासन ग्राम विकास विभाग यांचेकडून त्यांच्या कार्यालयाचे आदेश क्रं. ई-1336250/यो-13 दि. 29.09.2025 रोजी निर्गमीत करण्यात आलेले आहेत. सदर शुभवार्ता करताच मा. खा. श्री. भास्कररावदादा पाटील खतगांवकर, मा. आ. आनंदराव तिडके पाटील बोंढारकर, मा. आ. किशनराव वानखेडे, मा. सरदार लड्डूसिंग महाजन आदींनी आनंद व्यक्त करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायत बळीरामपूर, ग्रामीण पोलिस ठाणे सिडको, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय इतवारा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बांधकाम कार्यालय, जि.प. सामान्य प्रशासन विभाग कार्यालय, बळीरामपूर ग्रामस्थ, ज्ञात व अज्ञात सहकार्य मित्रमंडळी यांच्या सहकार्याबद्दल सदर तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर तथा सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, जि.प. नांदेड यांनी अंतःकरणपूर्वक आभार मानले. सदरील महत्त्वपूर्ण शासन निर्णयामुळे सदरील तिर्थक्षेत्र व बळीरामपूर गावाच्या विकासास निश्चितच चाचलना मिळणार असल्याचे व सदरील प्रकारचे महादलित तिर्थक्षेत्र हे सध्यातरी महाराष्ट्रातील एकमेव असल्याबाबत तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

## वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने वाई बाजार येथील जि.प.के. शाळेत जनजागृती कार्यक्रम संपन्न

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे

तालुका प्रतिनिधी माहूर

वन्यजीव सप्ताह दरवर्षी 1 ते 7 ऑक्टोबर या काळात साजरा केला जातो, ज्यामध्ये वनस्पती आणि वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन याबद्दल जनजागृती करण्यात येते. त्याच प्रमाणे माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत ०७/१०/२०२५ रोजी उपवनसंरक्षक नांदेडकेशवजी वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक जकास व कॅम्पा किनवट किरणचव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माहूर वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्या नियोजनानुसार वनपरिक्षेत्र कार्यालय माहूर अंतर्गत येत असलेल्या वनपरिमंडळ गोंडवडसा मधील वाई बाजार येथे वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. वन्यजीव आणि सापा विषयी खूप छान प्रकारे वनविभान कर्मचारी यांनि माहूर तालुक्यातील सर्पमित्रांनी माहिती दिली,यावेळी मानव -बिबट संघर्ष यांचे पी.पी.टी प्रेझेंटेश करण्यात आले, तसेच वन्यजीव सप्ताह याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर मानव वन्यजीव संघर्ष का निर्माण होतो व तो टाळण्यासाठी काय उपाय योजना करणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी सर्पमित्र मोहन मुर्खे व



त्यांची टीम यांनी आपल्या भागात आढळणाऱ्या सर्व सापांबद्दल विस्तृत माहिती दिली. यावेळी शिक्षक वर्ग, वनपरिमंडळ अधिकारी गोंडवडसा आली साहेब , वनरक्षक ज्ञानेश्वर माळेकर, ओम वरकड,संदीप तुपे, राकेश सुपरवर तसेच सर्पमित्र मोहन मुर्खे , अविनाश पठाडे, प्रफुल खडसे, गौतम खडसे , शैलेश पाटील व सर्व विध्यार्थी उपस्थितहोते